**सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन देण्याच्या संबंधातील धोरण.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन पूरकपत्र क्रमांक : जमीन १०/२००३/प्र.क्र.४०१/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २५ जुलै, २००७.

**वाचा :-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दि.२५.५.२००७.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस १०९५/प्र.क्र.३७/९५/ज-१, दि.९.७.१९९९.

**पुरकपत्र :-**

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम ४३ अन्वये अंध / अपंगांना निवासी प्रयोजनासाठी आरक्षणाची सवलत देण्याकरीता शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थांना गृहबांधणीसाठी शासकीय जमीन देण्याबाबतच्या शासन निर्णय क्रमांक एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज-१, दिनांक २५.५.२००७ च्या परिच्छेद क्रमांक १० मध्ये खालीलप्रमाणे १०(अ) परिच्छेद समाविष्ट करण्यात यावा.

१०(अ) :- "सहकारी गृहनिर्माण संस्थांना निवासी सदनिका / घरे बांधण्यासाठी शासकीय जमीन मंजूर करताना अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्य संख्येच्या ३% एवढे सदस्य अंध व अपंग प्रवर्गामधून समाविष्ट करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच अंध - अपंग सदस्य आरक्षित अथवा अनारक्षित प्रवर्गापैकी असू शकतात. यापुढे शासकीय जमिनीवरील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत ही अट अनिवार्य राहील."

हे शासन पूरकपत्र सामाजिक न्याय विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३४८/०७/व्यय-९, दि.१९.७.२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज. का. घरत)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रत : सर्व विभागीय आयुक्त.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

(८)

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व उपविभागीय अधिकारी.
सर्व अधिक्षक भूमी अभिलेख.
संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, सहकार व निबंधक सहकारी संस्था, पुणे.
विभागीय उप संचालक, नगररचना आणि इतर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (१) पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (२) नागपूर.
सर्व मंत्रालयीन विभाग
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक.
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे स्वीय सहायक
संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
महसूल व वन विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव व नियंत्रण अधिकारी,
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग (निवडनस्ती).

- 3 AUG 2007